## राष्ट्रीय आरोग्य अभियान ,

## आरोग्य विभाग, जिल्हा परिषद नंदुरबार

---

१५ व्या वित्त आयोग अंतर्गत नंदुरबार जिल्हयातील नगरपालीका नंदुरबार, तळोदा, शहादा येथील १२००० ते २०००० लोकसंख्या असलेल्या परिसरात नागरी आरोग्यवर्धिनी केंद्र सुरु करण्यासाठी ५०० स्केअर फुट किंवा जास्त जागा (स्वतंत्र संडास व बाथरुम सोय असलेले इमारत/हॉल भाडे तत्वावर (करार) ५ वर्षा करिता इमारत /हॉलची आवश्यकता आहे. खालील नगरपालीका हद्दीत (शहरात जागेची आवश्यकता आहे.

| अ.क्र. | शहरात आवश्यक असलेले जागेचा तपशिल | भाडेतत्वावर आवश्यक असलेली जागेचा तपशिल |
|---|---|---|
| १ | नंदुरबार नगरपालीका | ०१ |
| २ | शहादा नगरपालीका | ०१ |
| ३ | नवापुर नगरपालीका | ०१ |
| ४ | नगरपंचायत, धडगांव | ०१ |

अटि व शर्ती

१) इमारत भाडेतत्वावर देताना दुरुस्ती व नुतनीकरण स्वखर्चाने करुनच दयावे.या कार्यालया कडून कोणते देयक अदा केले जाणार नाही.

२) सदर प्रस्तावित जागेची पहाणी, आवश्यकता व निर्देशनानुसार पडताळणी मा. तालुका आरोग्य अधिकारी यांनी केल्यावरच जागा निश्चित व भाडे निश्चितीकरण करण्याची कार्यवाही करण्यात येईल

३) इमारत रंगगोटी करुन दयावे.

४) इमारतीचे भाडे ठरवितांना सार्वजनिक बांधकाम विभाग किंवा पायाभुत सुविधा विकास कक्ष मार्फत शासन नियमानुसार भाडे ठरविण्या येईल.

५) इमारतीचे मासिक भाडे ठरविले जाईल त्यानुसार मासिक भाडे अदा केले जाईल त्या व्यतिरिक्त कोणतेही जादाचे देयक अदा केले जाणार नाही.

६) सदर करारा दरम्यानच्या कालावधीमधील इमारतीचे नगरपरिषद अंतर्गत भरावयाचे मालमत्ता कर मुळ मालकांना भरावे लागेल या कार्यालया मार्फत अदा केले जाणार नाही.

७) विद्युतीचे देयक या कार्यालया मार्फत अदा केले जाईल त्या करिता स्वतंत्र वीज मीटर सुविधा मालकास करुन दयावी लागेल.

८) इमारत भाडयाचा महिना हा इंग्रजी कालगणनेनुसार गणला जाईल.

९) संबधित करार संपुष्टात आणण्याचा अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नंदुरबार व मा. जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद नंदुरबार यांनी राखुन ठेवला आहे.

१०) सदर करारा दरम्यानच्या कालावधीमध्ये पार्टी क्रमांक (मुळ मालक) १ यांनी इमारतीमध्ये किंवा इमारती आवारामध्ये बांधकाम, दुरुस्ती व देखभाल करु नये पार्टी क्रमांक २ (कार्यालय प्रमुख) यांनी परिस्थितीजन्य विचार करता विंनती केल्यास पार्टी क्रमांक (मुळ मालक) १ यांनी सदर इमारतीची दुरुस्ती करुन दयावी लागेल.(उदा लाईट, पाणी, नालेसफाई व इतर किरकोळ दुरुस्ती).

१०)सोबत दिलेले परिपूर्ण कागद कार्यालयीन वेळे (सुट्टीचे दिवस ) सोडून जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, आरोग्य विभाग जिल्हा परिषद नंदुरबार येथे समक्ष सादर करावे.

सही/-
जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक
राष्ट्रीय आरोग्य अभियान
जिल्हा परिषद, नंदुरबार

सही/-
मा सदस्य सचिव
जि.ए. आ.व कु.क.सोसा
तथा
मा.जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद, नंदुरबार

सही/-
मा. अध्यक्ष
जि.ए. आ.व कु.क.सोसा
तथा
मा.मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, नंदुरबार